आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३ वाजता

१९ जुलै २०२४ - शुक्रवार

पुढच्या आठवड्यात सुरू होत असलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकार नवीन सहा विधेयकं सादर करणार आहे. आपत्ती व्यवस्थापन कायद्यामध्ये काही सुधारणा सुचवणाऱ्या विधेयकासह अर्थविषयक विधेयकांचा यामध्ये समावेश आहे. लोकसभा सचिवालयानं काल या आगामी विधेयकांची सूची जाहीर केली. येत्या २२ जुलै रोजी संसदेचं अधिवेशन सुरु होणार असून ते १२ ऑगस्टपर्यंत चालेल.

२३ जुलै रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन अर्थसंकल्प सादर करतील. दरम्यान, लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी कामकाज सल्लागार समिती स्थापन केली असून ही समिती संसदेच्या दैनंदिन कामकाजाचा प्राधान्यक्रम निश्चित करण्याचं काम करेल.

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीनं भारतीय अर्थव्यवस्थेला गती मिळण्याचे संकेत दिले आहेत, असं भारतीय रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. कृषी क्षेत्राबाबतचा नवा दृष्टिकोन, आणि ग्रामीण भागातली वाढती मागणी अर्थव्यवस्थेसाठी सकारात्मक ठरत असल्याचं रिझर्व्ह बँकेनं आपल्या मासिक अहवालात म्हटलं आहे. राष्ट्रीय सांख्यिकी विभागानं अलीकडेच केलेल्या मासिक दरडोई खर्चाच्या सर्वेक्षणानुसार, ग्रामीण खर्चाचं प्रमाण वाढू लागलं आहे. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातल्या आर्थिक विषमतेची दरी कमी होत आहे. मनरेगा, अर्थात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा,

यासारख्या योजनांमध्ये मजुरीचे वाढलेले दर आणि शहरात स्थलांतरित झालेल्या नातलगांकडून ग्रामीण कुटुंबांना पाठवल्या जाणाऱ्या पैशाचं मोठं प्रमाण, यामुळे ग्रामीण कुटुंबांची खर्च करण्याची क्षमता वाढत असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

<><><><><>

मायक्रोसॉफ्ट कंपनीचं सॉफ्टवेअर बंद पडल्यानं जगभरातले उद्योग, बँकिंग सेवा आणि विमान कंपन्यांची माहिती तंत्रज्ञान यंत्रणा कोलमडून पडली आहे. भारतात विविध विमान कंपन्यांची बुकिंग, चेक-इनची ऑनलाइन सेवाही ठप्प झाली असून मुंबई विमानतळाला याचा सर्वाधिक फटका बसला आहे. एअर इंडिया, इंडिगो, स्पाइसजेट अशा अनेक कंपन्यांची विमानसेवा विस्कळीत झाली आहे. समस्या सोडवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचं या कंपन्यांनी सांगितलं आहे.

<><><><><>

नीट-युजी प्रवेश परीक्षा पेपर-फुटी प्रकरणी सीबीआयनं आज रांची इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस या संस्थेच्या एका विद्यार्थिनीला अटक केली. सीबीआयनं या विद्यार्थिनीचा मोबाईल, लॅपटॉप आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणं  जप्त केली आहेत.

<><><><><>

दुधाला हमी भाव मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारनं तातडीनं कायदा करावा, अशी मागणी दुग्ध व्यवसाय मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सहकार मंत्री अमित शाह यांना लिहिलेल्या पत्रात केली आहे. दूध दरातल्या चढ-उताराचा मोठा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. ही समस्या लक्षात घेऊन सरकारनं दूध उत्पादकांना दिलासा देण्यासाठी तातडीनं हा निर्णय घ्यावा, अशी विनंती त्यांनी केली आहे.

<><><><><>

वादग्रस्त प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या विरोधात केंद्रीय लोकसेवा आयोगाने खटला दाखल केला आहे. परीक्षेच्या नियमांचं उल्लंघन करत पूजा खेडकर यांनी स्वतःचं, वडिलांचं आणि आईचं नाव बदललं. तसंच फोटो, स्वाक्षरी, ईमेल आयडी, मोबाईल नंबरसह पत्ता बदलून आपली खोटी ओळख दाखवल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवला आहे. तसंच केंद्रीय लोकसेवा आयोगाची उमेदवारी रद्द करण्यासाठी कारणे दाखवा नोटीसदेखील जारी केली आहे.

दरम्यान, पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्यावर छळाचे आरोप केल्या संदर्भात पूजा खेडकर यांना उद्या २० तारखेला पुण्यात जबाब नोंदवण्यासाठी दुसरी नोटीस दिली आहे. त्यांना याआधी नोटीस देऊन काल उपस्थित राहायला सांगितलं होतं, मात्र त्या उपस्थित राहिल्या नव्हत्या.

<><><><><>

पंढरपुरातून जालना इथं परतणाऱ्या भाविकांच्या जीपला काल जालना - राजूर मार्गावर झालेल्या अपघातातल्या मृतांची संख्या सातवर पोहोचली आहे. तर सहा जण जखमी झाले आहेत. जखमींवर जालना इथल्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मृतांच्या कुटुंबाना पाच लाख रुपये मदतीची घोषणा केली आहे. तर जखमींच्या उपचाराचा खर्च सरकार करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

गणेशोत्सवाच्या काळात होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेता रेल्वे प्रशासनानं १ ते १८ सप्टेंबर या काळात गणपती विशेष रेल्वे गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार, मुंबई सीएसएमटी स्थानक ते सावंतवाडी आणि रत्नागिरी, लोकमान्य टिळक टर्मिनस ते सावंतवाडी आणि कुडाळ,  तसंच दिवा जंक्शन ते चिपळूण दरम्यान दोन्ही बाजूंनी या विशेष गाड्यांच्या फेऱ्या होतील, असं रेल्वेनं जारी केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

श्रीलंकेमध्ये आज सुरू होणाऱ्या महिला आशिया चषक टी-20 क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाचा सामना पारंपरिक प्रतिस्पर्धी असलेल्या पाकिस्तानविरुद्ध होणार आहे. भारतीय वेळेनुसार संध्याकाळी सात वाजता हा सामना सुरू होईल. हरमनप्रीत कौर भारतीय संघाचं नेतृत्व करत आहे.

त्याआधी दुपारी दोन वाजता संयुक्त अरब अमिराती आणि नेपाळ यांच्यातल्या सामन्याने स्पर्धेची सुरुवात होईल.

<><><><><>

महाराष्ट्र, गुजरात, गोवा, आंध्रप्रदेश आणि तेलंगणामध्ये तुरळक ठिकाणी आज अती जोरदार पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज असून, या ठिकाणी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

<><><><><>